संकल्प सोडल्या शिवाय यश मिळत नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १६ एप्रिल २०२५ | अंक १२५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# मुस्लीम या देशात कायद्यात राहिले तर फायद्यात - धीरेंद्र शास्त्री महाराज



## असे आहे श्री बागेश्वर बालाजी सनातन मठ

साडेचार एकर क्षेत्रफळावर मंदिराची रचना आहे. या ठिकाणी तळ मजला अधिक एक मजली आहे. मंदिराच्या पाठीमागच्या ठिकाणी यज्ञ शाळेची निर्मिती करण्यात आली आहे. पहिल्या मजल्यावर श्री बागेश्वर बालाजीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. बालाजींच्या उजव्या बाजूला गणरायाची मूर्ती आहे. डाव्या बाजूला सफेद स्फटीकाचे शिवलिंग आहे. तसेच बालाजींच्या मूर्तीच्या समोरच प्रभू श्रीरामचंद्र सीतामाई लक्ष्मण आणि हनुमंत स्वारीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. तळ मजल्यावर पंडित धीरेंद्र शास्त्री यांचे बैठक व्यवस्थेचे तसेच छोट्या खाणी दिव्य दरबार सभागृह बनवण्यात आले आहे. या ठिकाणी रामायणातील विविध प्रसंगाचे चित्र रेखाटून रामायण दाखवण्यात आले आहे.

हिंदुस्थानमध्ये राहणारा प्रत्येक जण हिंदू आहे. आम्ही मुस्लिम विरोधी नाही. या देशाने एपीजे अब्दुल कलाम यांना स्वीकारले. तसेच इतरांनाही स्वीकरले. परंतु आज भयप्रद वातावरणामुळे पश्चिम बंगालमधून हिंदू पलायन करीत आहेत. उद्या महाराष्ट्रमध्ये करतील. पुढे मध्य प्रदेशमध्ये होईल. एका विशेष समुदायाकडून हिंदुना घाबरवण्याचे प्रयत्न येथील सरकारच्या मदतीने सुरू आहे, हे निंदनीय आहे. मुस्लीम या देशातील कायद्यात राहिले तर फायद्यात राहतील, असे धीरेंद्र शास्त्री महाराज यांनी म्हटले आहे.देशातील दुसरे आणि महाराष्ट्रातील पहिले श्री बागेश्वर बालाजी सनातन मठ भिवंडीतील हायवे दिवे येथे तयार झाले. श्री बागेश्वर मठाचे मठाधिपती पंडित धीरेंद्र कृष्णा शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली बनवण्यात आलेल्या श्री बागेश्वर बालाजी सनातन मठाचा लोकार्पण सोमवारी झाले. यावेळी धीरेंद्र शास्त्री बोलत होते. ते म्हणाले, महाराष्ट्रातील सर्वसाधारण गोरगरीब बागेश्वर बालाजी भक्तांना मध्यप्रदेश येथे जाणे शक्य होत नाही, अशा भक्तांसाठी भिवंडी येथील बागेश्वर बालाजी धाम ही पर्वणी आहे. हे मठ सनातन धर्म प्रसाराचे केंद्र व भक्तांसाठी आस्थेचे श्रद्धास्थान बनणार आहे, असे प्रतिपादन धोरेंद्र महाराज शास्त्री यांनी केले आहे.

# कोणत्या लाडक्या बहिणींना फक्त ५०० रुपये मिळणार? आदिती तटकरेंनीच घोळ संपवला




ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्र सरकारने लाडकी बहीण योजना सुरु केली होती. या योजनेतंर्गत महिलांना १५०० रुपये देण्यात येतात. आता मात्र या योजनेत मोठा ट्विस्ट आला आहे. लाडकी बहीण योजनेतील तब्बल ८ लाख महिलांना आता १५०० रुपयांऐवजी फक्त ५०० रुपये मिळणार आहेत. आता या ८ लाख महिला नेमक्या कोण, त्यांना फक्त ५०० रुपयेच का दिले जाणार असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. आता यावर महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी सविस्तर उत्तर दिले आहे.

अदिती तटकरे यांनी नुकतंच एक ट्वीट केले आहे. या ट्वीटमध्ये अदिती तटकरे यांनी राज्यातील विधानसभा अधिवेशनातील एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या पोस्टमध्ये त्यांनी कोणत्या लाडक्या बहिणीला फक्त ५०० रुपये दिले जाणार याबद्दलची सविस्तर माहिती दिली आहे.अदिती तटकरे काय म्हणाल्या?दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार इतर कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ न घेणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपये दरमहा सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे. तसेच, इतर शासकीय योजनांचा १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेणाऱ्या महिलांना उर्वरित फरकाची रक्कम सन्मान निधी म्हणून वितरित करण्यात येत आहे. त्याच शासन निर्णयाला अनुसरून नमो शेतकरी सन्मान योजनेचा दरमहा १००० रुपये लाभ घेत असलेल्या ७७४१४८ महिलांना उर्वरित फरकाचे ५०० रुपये सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे.एकाही पात्र भगिनीस या योजनेतून वगळण्यात आले नसून, सदर प्रक्रियेत दिनांक ३ जुलै २०२४ नंतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याबाबतचे स्पष्टीकरण मी स्वतः विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले असून विधिमंडळाच्या कामकाजात त्याची नोंद आहे. तरीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत सातत्याने अपप्रचार करणाऱ्या विरोधकांचे एकतर प्रशासकीय आकलन कच्चे आहे,

## कै.विमलबाई अंगदराव वरपडे यांचे निधन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : नांदेड येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापिका कै.विमलबाई अंगदराव वरपडे वय वर्षे ७२ यांचे



वृद्धापकाळाने दि.१५-एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता निधन झाले असून.त्यांच्या पार्थिवावर दि.१६-एप्रिल रोजी सकाळी १० वाजता नांदेड येथील गोवर्धन घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै. विमलबाई अंगदराव वरपडे त्यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली नातू असा मोठा परिवार आहे.डॉ.संजीव अंगदराव वरपडे प्रा.सतीश अंगदराव वरपडे प्रा.सविता किशनराव पवार प्रा.सरिता नागनाथ काळे यांच्या त्या आई होत.

# तो कुत्रा मी दत्तक घेणार, भिडेंना कुत्रा चावल्यानंतर वकिलाने केली घोषणा!

सांगलीत एका धारकऱ्याच्या इथे गेलेले असताना संभाजी भिडे यांना एका कुत्र्याने चावा घेतला आहे. सध्या त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. सध्या त्यांची प्रकृती आहे. दरम्यान, भिडे यांना कुत्रा चावल्यानंतर वेगवेगळ्या स्तरातून प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. कुत्रा हा प्रामाणिक प्राणी असतो, तो भिडे यांना का चावला याची एसआयटी चौकशी करायला हवी, अशी खोचक टिप्पणी वडेट्टीवार यांनी केली. त्यानंतर ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील ॲड. जय गायकवाड यांनी तर मोठी घोषणा केली आहे. भिडे यांना जो कुत्रा चावला आहे, त्याला मी दत्तक घेणार आहे, असं गायकवाड यांनी म्हटलंय. मी कुत्र्याला दत्तक घेणार.. संभाजी भिडे यांना सोमवारी सांगलीमध्ये एक कुत्री (श्वान) चावला होता. त्यानंतर संभाजी भिडे यांनी शासकीय रुग्णालयामध्ये उपचार घेतले होते. मात्र उल्हासनगरमधील ॲड. जय गायकवाड यांनी एक मोठी घोषणा केली आहे. संभाजी भिडे यांना जो कुत्रा चावला आहे, त्याला मी दत्तक घेणार आहे. तसंच त्या कुत्र्याची संपूर्ण काळजी आम्ही स्वतः घेणार असं जय गायकवाड म्हणाले आहेत. तेसच नागरिकांना हा कुत्रा आढळल्यास त्यांनी माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी केलेय संभाजी भिडेंना कुत्रा कधी चावला? मिळालेल्या माहितीनुसार संभाजी भिडे यांना सोमवारी एका कुत्रीने चावा घेतला. ते सांगली शहरातील माळी गल्लीत एका धारकऱ्याच्या घरी गेले होते. या धारकऱ्याकडून भिडे यांना जेवणाचे आमंत्रण होते. मात्र परतताना त्यांच्यावर एका कुत्रीने हल्ला केला आणि पायाचा चावा घेतला.

# कास अल्ट्रा मॅराथॉन मध्ये योगा प्रतिष्ठान चे श्री संतोष भोकरे,प्रशासकीय अधिकारी एलआईसी सर्व द्वितीय.

बीड प्रतिनिधी :- दिनांक 13 एप्रिल 2025 रोजी झालेल्या कास अल्ट्रा मॅराथॉन मध्ये 50 किलोमीटर धावणे या अतिशय कठीण अशा असणाऱ्या कास घाटामध्ये रात्री 12 वाजता सुरू झालेली मॅराथॉन त्यांनी 5 तास 27 मिनिटात पूर्ण करून त्यांच्या वयोगटात द्वितीय क्रमांक पटकावला, या अगोदर त्यांनी अनेक देश विदेशातील स्पर्धेत यश तसेच पारितोषिक मिळविले आहेत. साऊथ आफ्रिकेत 90 किलोमीटर रनिंग करणारे ते जिल्ह्यातील पाहिले अल्ट्रा रनर आहेत. भारतीय आयुर्विमा महामंडळात वरिष्ठ पदावर कार्य करीत असताना योगा



प्रतिष्ठान च्या माध्यामातून दररोज 2 तास कसून घाटामध्ये सराव करतात. तसेच प्रा.शरद खिल्लारे यांनी 65 किलोमीटर गटात 6 तास 54 मिनिटात, श्री हरि ठोंबरे यांनी 7 तास 36 मिनिटात तसेच श्री बाळासाहेब करंडे यांनी 50 किलोमीटर 6 तास 54 मिनिटात पूर्ण केली. त्यांचे योगा प्रतिष्ठान च्या वतीने सत्कार करण्यात आला.

# आयआयपीएच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी राहूल कर्डिले तर सचिवपदी प्रा. बालाजी कतुरवार यांची निवड

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन अर्थात आयआयपीएच्या नांदेड शाखेच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

आयआयपीए नवी दिल्ली ही भारत सरकारच्या कर्मचारी , लोकतक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालयाअंतर्गत लोकप्रशासन विकास , संशोधन व प्रशासकीय सुधारणा या क्षेत्रात कार्य करणारी एक मूलभूत संशोधन व प्रशिक्षण संस्था आहे. केंद्र शासनाच्या संस्थेअंतर्गत आय आयपीएची नांदेड शाखा स्थापन करण्यात आली आहे. नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीने स्थानिक प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देण्यासाठी, प्रशासकीय क्षमता बांधणी विकसित करण्यासाठी आणि प्रशासकीय सुधारणेच्या अनुषंगाने लोकप्रशासन विषयात लेखन, संशोधन व प्रशिक्षण विषयी विविध कार्य करण्यासाठी आयआयपीएची नांदेड शाखा स्थापन करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणी निवड करण्यासाठी दिनांक 14 एप्रिल 2025 रोजी जिल्हाधिकाऱ्याच्या कक्षात आयआयपीएचे महाराष्ट्र राज्य विभागीय केंद्राचे सचिव तथा नांदेड गुरुद्वारा बोर्डाचे अध्यक्ष श्री.विजय सतबीरसिंग यांच्या अध्यक्षतेख़ाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत नांदेड शाखा कार्यकारी मंडळाची बिनविरोधपणे निवड करण्यात आली.

यामध्ये नांदेड शाखा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून नांदेडचे जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले तर सचिव म्हणून देगलूर महाविद्यालय देगलूर येथील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख प्रा. डॉ. बालाजी कतुरवार यांची निवड करण्यात आली. तर कोषाध्यक्ष म्हणून पीपल्स महाविद्यालय नांदेड येथील प्रा. डॉ. अमोल काळे यांची निवड करण्यात आली आहे.



आयआयपीए नांदेड शाखा कार्यकारी मंडळ पदसिद्ध सदस्य म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांची निवड करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये आयआयपीएची शाखा स्थापन झाल्यामुळे नांदेड जिल्हा प्रशासनाच्या वतीने विविध लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करणे, माहिती व तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासकीय सेवा सुलभ, पारदर्शक व गतीशील बनवीने, विविध विकास कामांमध्ये लोकसहभाग वाढविणे, प्रशासकीय अधिकारी वर्गांना वेळोवेळी प्रशिक्षण देऊन शारीरिक , मानसिक , बौद्धिक व नैतिक क्षमता विकसित करणे, लोककल्याणकारी व संवेदनशील प्रशासन व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, लोकप्रशासन विषयाचे प्राध्यापक व संशोधक यांच्यात विचारमंथन करण्यासाठी आयआयपीएची नांदेड शाखा एक वरदान ठरणार आहे. आयआयपीए नांदेड शाखा कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. राम जाधव , अरविंद नळगे, डॉ. व्यंकट विळेगावे, दिनेश मूनगीलवार, डॉ. वामन कळमसे , डॉ. रवी बरडे, डॉ. दीपक वाघमारे, डॉ. विजय तरोडे ; डॉ. मिर्झा बेग यांची यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

प्रस्तुत बैठकीला आयआयपीए महाराष्ट्र विभागीय शाखेचे कार्यकारी मंडळ सदस्य डॉ. प्रदीप लोंढे , श्री किरण चिद्रावार डॉ. बाळासाहेब भिंगोले प्रा. शंकर लेखने यांनाही निमंत्रित सदस्य म्हणून निवडण्यात आले.

या बैठकीस नांदेड जिल्ह्यातील विविध प्रशासकीय अधिकारी, लोकप्रशासन विषयातील प्राध्यापक व संशोधक उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १६ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## आई-वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या कार्ट्यांवर जिल्हाधिकारी लक्ष ठेवणार

जन्मदात्यांच्या मालमत्तेवर डोळा ठेवायचा, वारसदार म्हणुन दिमाखाने संपत्तीत वाटा मागायचा, मात्र त्यांच्याविषयी संवेदना ठेवत कर्तव्याचं पालन न ठेवता आई-वडिलांनाच शारीरीक तथा मानसिक त्रास देण्याच्या घटना कुटुंब संस्थेत मोठ्या प्रमाणावर समोर येत असताना कायद्याचा बडगा दाखवुनच आता धेंडांना देखील वटणीवर आणण्यासाठी न्यायदेवतेलाच पुढे यावं लागलं. एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जेष्ठ नागरिकांचे जीवन आणि मालमत्ता सुरक्षित रहावी, सन्मानाने जगता यावे याची खात्री जिल्हाधिकाऱ्यांनी करणे त्यांचे कर्तव्य राहिल. एवढेच नाही तर त्यांचा सांभाळ न करणाऱ्या धेंडांना पुर्वजात संपत्तीतुन पुन्हा बाजुला काढण्याचे अधिकार देखील जिल्हा दंडाधिकाऱ्यानाच दिले. खरं तर वर्तमान कुटुंब व्यवस्थेतल्या सामाजिक आवाहनाला आदर्श देणारा हा निर्णय म्हणावा लागेल. सावधान, लेकरांनो जन्मदात्याचा नीट सांभाळ करा, अन्यथा सरकार परत आई-वडिलांना संपत्ती मिळवुन देवु शकते. आपल्या देशातल्या कुटुंब संस्थेत वेगाने बदल होत असुन एकत्र कुटुंब पद्धती खऱ्या अर्थाने ९५ टक्के रसातळाला गेली असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. वास्तविक पहाता सामाजिक जीवनात एकत्र कुटुंब पद्धतीचे फायदे, त्यातला जिव्हाळा, मायेचा ओलावा, रक्ताच्या नात्यातील स्नेह संबंध खरंच आदर्शव्रत होते. १०० सदस्यांच्या कुटुंबात एक कर्ता आणि त्याचाच बोलबाला अशी एकत्र कुटुंब पद्धती होती. वर्तमान परिस्थितीत माझी पत्नी-माझं घर आणि जन्मदाते बेघरं असं चित्र समोर येत असुन सरकारला वृद्धाश्रम काढावे लागणं ही वेळ समाजात येत असेल तर यापेक्षा दुर्दैव नाही. मुळात माता-पित्याच्या संपत्तीवर डोळा ठेवुन त्यांच्याविषयी स्वार्थाने कर्तव्याची जाणिव ठेवणं ही प्रवृत्ती मुळातच राक्षसी म्हणावी लागेल. ज्यांनी जन्माला घातले, त्यांच्याविषयी कायद्याने आस्था शिकवणं हे देखील दुर्दैव नक्कीच होय. पण हे सारं चित्र सद्या समाजात मोठ्या प्रमाणावर पहायला मिळतं. खरं तर एक काळ अज्ञानाचा मानवी जीवनात होता, त्यावेळी एकत्र कुटुंब पद्धती ज्ञान घेतलेल्या घटकापेक्षाही श्रेष्ठ होती. पण ज्ञानाच्या लाटा कमालीच्या उसळल्या आणि खऱ्या अर्थाने आज मोठ्या प्रमाणावर ज्ञानवंतांची मांदियाळी अर्थात शिक्षण घराघरात जावुन पोहोचले, ज्यामुळे प्रत्येकाच्या जीवनाचा उत्कर्ष होताना दिसतोय. समाजसुधारकांनी यासाठी जीवाचे रान केलं. तत्कालीन काळात तो भाग वेगळा. शिक्षणाने माणुस शहाणा होतो असं म्हटल्या जातं. पण सद्याची सामाजिक स्थिती आणि कुटुंब व्यवस्था लक्षात घेता ज्या घरात लेकरांना जीवाचं रान करून आई-वडिलांनी शिकवलं, मोठं केलं. पोटाला चिमटा घेत, काबाडकष्ट करत एकवेळ स्वतःच्या पोटाला भाकरीचा घास खाल्ला नाही, पण लेकराला जीवापाड सांभाळताना कवटाळुन घेत काळजी घेतली. त्याच घरात खऱ्या अर्थाने आज मोकार धेंड जन्मदात्या आई-वडिलांची परवड करताना दिसतात. जिथे शिक्षण कमी, त्यांची लेकरं आजही आई-वडिलांची ईश्वरासारखी सेवा करतात. अनेक कुटुंब जर डोळ्यासमोर घेतली तर सुशिक्षितांच्या लोकांमध्येच माता-पित्यांची परवड जास्त होताना दिसतेय. खरं तर माता पित्यांचा सांभाळ करायचा नाही आणि त्यांच्या संपत्तीवर डोळा ठेवायचा ही लेकरांच्या अंगी राक्षसी प्रवृत्ती म्हणावी लागेल. दुसरी गोष्ट म्हणजे ज्या कुटुंबात आई-वडिलांची देवासारखी पुजा होते, तिथे त्या लेकरांचे संसार १०० टक्के सक्सेसफुल कुठल्याही गोष्टीची कमतरता नाही. सर्व स्तरावर यश मिळते. मात्र जिथे माता पित्यांची हेळसांड होते, त्या लेकरांचे संसार देशोधडीला लागल्याचे अनेक उदाहरणे सांगता येतील. खरं तर या प्रश्नावर ज्यांचे डोळे उघडलेले रहातात, त्यांनी आत्मचिंतन करायला हवं. राजेश्वरप्रसाद रॉय जे की गृह निर्माण मंडळाचे निवृत्त अभियंता निवृत्तीनंतर त्यांनी स्वकमाईच्या जागेवर २० खोल्यांचे बांधकाम उत्पन्नाचे साधन म्हणुन केले होते. त्यांचा विवाहित मुलगा पत्नीसह वेगळा रहायचा. २०२१ मध्ये मुलाने पर्यायी जागा मिळेपर्यंत वडिलांकडे तात्पुरती एक खोली मागितली नंतर तीन खोल्यावर अतिक्रमण केले आणि वडिलांची देखभालही १०० टक्के सोडली. त्यांनी थेट सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आणि मग हे प्रकरण पोलीस ठाण्यात गेले. वडिलांनी मुलाने केलेल्या मालमत्तेवरची अतिक्रमण हाटवण्याची मागणी केली. तिथे सुनेने देखील हिंसाचार कायद्याचा खटला दाखल केला होता. मात्र जेष्ठ नागरिक न्यायाधिकरणाने मुलाला मालमत्तेतुन काढण्याचे आदेश दिले. सुप्रिम कोर्टाने देखील तेच आदेश कायम ठेवले. जेष्ठ नागरिक कल्याण कायदा ज्या उद्देशापोटी केला होता, तो अपयशी ठरू नये म्हणुन मालमत्तेवर टाच ठेवत माता-पित्यांना त्रास देणाऱ्या लेकरांनाच मालमत्तेतुन काढण्याचा न्यायालयाने आदेश दिला. आता जेष्ठ नागरिकांना सुरक्षित आणि सन्मानाने जगता यावे याची खात्री करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले असुन एवढेच नाही तर जे मुलं आई-वडिलांना त्रास देतात, त्यांना पुर्वजात मालमत्तेतुन काढुन टाकण्याचे देखील अधिकार जिल्हादंडाधिकारी यांनाच सर्वोच्च न्यायालयाने बहाल केले. दरम्यान, या निकालाचा खऱ्या अर्थाने वर्तमान कुटुंब व्यवस्थेत अत्यंत चांगला परिणाम आणि बदल घडुन येवु शकतो. एक गोष्ट खरी आहे की, जन्मदात्यांच्या बाबतीत आपली कर्तव्ये आणि जबाबदारी याचा विसर पडणं हाच खरा मुर्खपणा म्हणावा लागेल. माझे आई-वडिल कसेही असले तरी ते माझे जन्मदाते, ते माझ्यासाठी परमेश्वर. बायकोच्या सांगण्यावरून मी जन्मदात्याला त्रास देत असेल तर यापेक्षा सामाजिक गुन्हा दुसरा कोणता नाही. हा कुठंतरी विचार लेकराने देखील करणे आवश्यक आहे. समाजातल्या प्रत्येक कुटुंब घटकांनी या निकालाचा विचार करायला हवा. जेष्ठ नागरिकांनी देखील आपलं मानसिक स्वास्थ्य टिकवताना जिथे परवड होते, त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी यांचा दरवाजा ठोठावण्याची गरज नक्कीच. सरळ सांगायचं झालं तर कायद्याचा धाक दाखवुन माता-पित्यांचा सांभाळ हीच फार मोठी चुक लेकराची असु शकते. त्यापेक्षा जन्मदातेच हे माझे भाग्यविधाते आणि परमेश्वर या भाव ऱ्हदयातुन प्रत्येक लेकरांनी माता पित्यांकडे पहावं. त्यांनी जन्माला घातलं म्हणुन मी मानवी जीवनात पृथ्वीवर आलो हे देखील आत्मस्वरूपी ओळखायला हवं. कर्तव्य, जबाबदारी याचंही भान असणं महत्वाचं. जिथे माता-पित्यांचा सन्मान, तिथे परमेश्वराचं वास्तव्य आणि सर्वात म्हणजे सुनबाई म्हणुन ज्यांची जबाबदारी कुटुंबात तिने देखील सासु आणि सासऱ्यांना माता

# वाळवा तालुक्यातील शिरगाव येथील सिद्धेश्वर मंदीर










वाळवा हे माझे माहेरचे गाव आहे.शिरगाव येथील सिध्देश्वर हे माहेरचे कुलदैवत आहे.खूप वर्षांपासून सिध्देश्वरला जाण्याची ईच्छा होती. दि.०८|०४|२०२५ रोजी हा योग जुळून आला. वाळवा हे गाव कृष्णाकाठी वसले आहे.संपन्न आहे.नदीच्या पलिकडे शिदोबा उर्फ सिध्देश्वरचे मंदीर आहे.

आता मंदिराचा संपूर्ण कायापालट झाला आहे. आजूबाजूला सुंदर निसर्ग परिसर आहे.मन प्रसन्न होते. देवळात एक पिंपळ वृक्ष आहे.पिंपळवृक्षाखाली सातवे मठाधिपती प.पू.विद्याशंकर भारती याची जिवंत समाधी आहे.जोपर्यंत पिंपळ वृक्ष हिरवा आहे तोपर्यंत समाधी जिवंत आहे.हे एक वेगळेच वैशिष्ट्य आहे.

येथील पिंडीवर दोन भाग पहावयास मिळतात. ते म्हणजे हरी आणि हर.हरी आणि हर असलेली ही शिवलिंगाची प्रतिकृती भारतातील एकमेव आहे.या मंदिराला पूर्ण प्रदक्षिणा घातली जाते.

एकूणच सुंदर ठिकाण आहे.संपन्न कृष्णाकाठ, सुंदर निसर्ग सौंदर्य आणि अद्भूत सिध्देश्वर मंदीर. मन प्रसन्न होऊन जाते. एकदा अवश्य भेट देण्यासारखे ठिकाण आहे.

ॐ वैष्णवै नमः?
ॐ हरये नमः ?
ॐ हरिहरै नमः?
???

# संतोष रायबान यांना ज्ञानवर्धिनी साहित्य पुरस्कार प्रदान

सांगोला प्रतिनिधी /समाधान मोरे

पंढरपूर : ग्रामीण मराठी कवी संतोष रायबान यांना त्यांच्या ‘ओल काळजाची’ या पुस्तकासाठी खेडभाळवणी येथील स्व. कुबेर आबा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ज्ञानवर्धिनी वाचनालयाच्या वतीने ‘ज्ञानवर्धिनी’ पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप होते. हा पुरस्कार त्यांना मिळाल्याबद्दल सर्व परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. समाजातील नानाविध घटकांवर आधारित, सत्य घटनेवर आधारित असलेल्या कवितांना पुरस्कारामुळे योग्य न्याय मिळाला असेही बोलले जात आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत



सर होते. यावेळी सागर पाटील, धाराशिव साखर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर अँड. अमर पाटील, ज्येष्ठ साहित्यिक हरिश्चंद्र पाटील, ज्ञानवर्धिनी वाचनालयाचे संस्थापक सचिव राजेश पवार सर, आयुर्वेदाचार्य बाबुराव पाळेकर, बळीराजा प्रतिष्ठान शेळवेचे अमोल चव्हाण, अंकुश गाजरे उपस्थित होते.

# डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या ३ विश्वविक्रमांना रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

श्रीदा क्रिएशन स्थापना :19 मार्च 2025 संपर्क: 8669670070
===========
डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या 3 विश्वविक्रमांना रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे:13 एप्रिल 2025 डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी१९६३पासून भारतासह नेपाळ-न्यूझीलंड-व्हिएतनाम- कंबोडिया -इंडोनेशिया -चीन - श्रीलंका-सिंगापूर-मलेशिया-थायलंड-दुबई-मॉरिशस - -भूतान-रशिया आदि देशात स्वखर्चाने ‘सबकुछ.मधुसूदन’ हा चालता बोलता हिंडता फिरता एकपात्री कार्यक्रम केला आहे.या कार्यक्रमाचा तब्बल 82,000 वा विश्वविक्रमी प्रयोग डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी नुकताच सादर केला. याच प्रसंगी डॉ.घाणेकर यांनी व्हाटसअप. स्टेटसवरील लिसन माय व्हिसल ह्या शीळवादनाच्या एकपात्री कार्यक्रमाचा 1000वा आविष्कार सादर केला तसेच गेली 20 वर्ष डॉ.मधुसूदन घाणेकर डहाळी ह्या अनितकालिकाची चळवळ चालवतात, ह्या अनितकालिकाच्या 700 व्या विश्वविक्रमी अंकाचेही प्रकाशन याच सोहळ्यात झाले.डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या या तिन्ही विश्वविक्रमांना उपस्थित रसिकांनी भरभरुन दाद दिली. सुप्रसिद्ध अभिनेत्री आणि श्रीदा क्रिएशन च्या प्रिया प्रमोद दामले यांनी हा सोहळा आयोजित केला होता. “डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी आत्तापर्यंत विविध क्षेत्रात 300 विश्वविक्रम केले आहेत. अनेक क्षेत्रातील दैदीप्यमान कार्यासाठी त्यांना आंतरराष्ट्रीय जीवन.गौरव पुरस्कार प्राप्त झाले आहेत.पण असे असुनही ह्या कलावंताचे पाय जमिनीवर आहेत.डॉ. मधुसूदन घाणेकर यांचे हे कार्य पुढील काही शतकांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल “ असे गौरवोद्गार, डॉ.मधुसूदन घाणेकर यांचा विशेष सत्कार करताना प्रिया प्रमोद दामले यांनी काढले.या सोहळ्यात सुप्रसिद्ध रंगकर्मी १९८३सालापासुन नाटकात काम करायला सुरवात करून दिवा जळू दे सारी रात,मोरुची मावशी, तो मी नव्हेच, अश्रुंची झाली फुले , वेगळ व्हायचय मला अशी नाटके आणि तसेच वाजवू का सिनेमा याला जीवन ऐसे नाव या चित्रपटात भुमिका साकारलेल्या चित्रा साठ्ये, अठरा वर्ष कार्यरत असेलल्या IT-Admin Head या पदावरून स्वेच्छानिवृत्त होऊन कलर्स मराठीवरील जय जय स्वामी समर्थ मालिकेत “दत्तगुरु, श्रीपाद श्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती” ह्या भूमिका साकारणारे तसेच आत्ता कलर्स मराठी वरील आई तुळजाभवानी मालिकेत “देवर्षी नारदमुनी” ही भूमिका करत असणारे अभिनेते अभिषेक खेडकर , ख्यातनाम ज्योतिर्विद डॉ.जयश्री बेलसरे दत्तोपासक मेघना मधुसूदन घाणेकर आदि प्रमुख अतिथींचीही डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्याविषयी गौरवपर भाषणे झाली .प्रमोद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या शहर कार्याध्यक्ष,वर्ल्ड क्वीन बीजच्या अध्यक्ष मधुकर्णिका सारिका सासवडे, कवी सुनील जोशी, वर्ल्ड लिटरेचर संस्थेच्या दीपाराणी गोसावी ,ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष भागवत , गिर्यारोहक विलास जोशी आदि मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. सचिव अजिता मुळीक , बालसचिव अजया मुळीक, माधुरी भागवत आदिंनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कृपया प्रसिध्दीसाठी अजिता मुळीक सचिव.
==================

## साहेबराव नंदन [ तात्या ] डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय साहित्य भुषण पुरस्काराने सन्मानित



पिंपळनेर [ प्रतिनिधी ] विश्वशांती बुध्दिस्ट फाऊंडेशन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय शिक्षक अकादमी धुळे शहर यांचा बहुमानांकित , बहुचर्चित , सदैव चर्चेत असलेला, बहुसंख्य प्रस्तावातून निवडक साहित्यिकांना दिला जाणारा राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय साहित्य भुषण पुरस्कार २०२५ नुकताच राज्य सरकारी कल्यान भवन शिवतिर्थ धुळे येथील सभाग्रहात उत्साही वातावरणात खान्देशातील गावगाडाकार कवी लेखक संपादक श्री साहेबराव नंदन [ तात्या ] ताहाराबादकर नाशिक यांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. भास्करराव अमृतसागर, साहित्यिका कवयित्री मुंबईच्या आशाताई ब्राम्हणे यांच्या शुभ हस्ते टाळ्यांच्या कडकडाटात प्रदान करून, सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी राज्यभरातील बहुसंख्य साहित्यिक आणि जेष्ठ विचारवंत उपस्थित होते. साहेबराव तात्यांना मिळालेल्या पुरस्काराचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अध्यात्मिक क्षेत्रातून व सामाजिक संस्थांनी अभिनंदनाचा वर्षाव करत आनंद व्यक्त केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव बाईकर
बुधवार १६ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# आज जिल्हा गुंतवणूक परिषद

## उद्योगमंत्री उदय सामंत यांची उपस्थिती

बीड, दि.15 : राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली उद्या जिह्ला गुंतवणूक परिषद होत आहे. ही परिषद येथील ग्रँड यशोदा हॉटेल, बार्शी नाका येथे सकाळी 10.00 वाजता याचे उद्घाटन होईल. महाराष्ट्रातील जिह्लयांना सक्षम बनविणे आणि गुंतवणूक आकर्षित करण्यास चालना मिळावी यासाठी राज्यातील सर्व जिह्लयात उद्योग संचलनालय आणि जिह्ला उद्योग केंद्रामार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

उद्या होणा-या या परिषदेस विकास आयुक्त (उद्योग), अध्यक्ष मैत्री दिपेंद्रसिंह कुशवाह तसेच जिह्लाधिकारी अविनाश पाठक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यात उद्योजक तसेच इतरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सहसंचालक बी.टी. यशवंते आणि जिह्ला उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव यांनी केले आहे.

# देव महेंद्र चव्हाण यांनी आपल्या जबरदस्त कामगिरीने पुन्हा एकदा पावरलिफ्टिंग क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले

श्री गणेश व्यायाम शाळा नाशिक रोड आयोजित नाशिक जिल्हा बेंच प्रेस आणि डेड लिफ्ट चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत देव महेंद्र चव्हाण यांनी आपल्या जबरदस्त कामगिरीने पुन्हा एकदा पावरलिफ्टिंग क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या स्पर्धेत देव यांनी बेंच प्रेस मध्ये सर्वाधिक वजन उचलत 'स्ट्राँग मॅन' हा किताब पटकावत गोल्ड मेडल व प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र मिळवले. त्यांच्या ताकदीची झलक पाहून प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात कौतुक केले. फक्त बेंच प्रेसच नव्हे तर डेड लिफ्ट या प्रकारातही देव महेंद्र चव्हाण यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक, गोल्ड मेडल आणि प्रमाणपत्र मिळवले. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे व चिकाटीचे हे फळ असून त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले की ते जिल्हा स्तरावरील आघाडीचे पावरलिफ्टर आहेत. मागील स्पर्धांमधून त्यांनी जी प्रतिष्ठा कमावली होती, ती त्यांनी याहीवेळी कायम राखली. देव चव्हाण यांच्या या विजयामुळे संपूर्ण जिल्ह्यात त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्री गणेश व्यायाम शाळा तसेच त्यांच्या प्रशिक्षकांनी त्यांच्या यशाबद्दल विशेष आनंद व्यक्त केला आहे. सोशल मीडियावरही त्यांचे कौतुक होत असून नाशिक जिल्ह्याच्या पावरलिफ्टिंग क्षेत्रात देव चव्हाण हे एक प्रेरणास्थान म्हणून पुढे येत आहेत. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

संजय पाटील



# स्व. शरदजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबईत महारक्तदान शिबीर

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी

स्व. शरदजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त एस बी ग्रुपच्या वतीने रविवार दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ ह्या वेळेत महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोपरखैरणे येथील गुलाब सन्स डेअरीसमोरील छत्रपती संभाजी राजे भोसले रिक्षास्टँड येथे तसेच ठाणे बेलापूर मार्गावर घणसोली रेल्वे स्टेशन येथील एस बी रिक्षा स्टँड येथे हे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने रक्तदाते उपस्थित होते. सदर उपक्रम दरवर्षी राबवण्यात येत असल्याचे आयोजक एस बी ग्रुपचे अध्यक्ष डॉ देवेंद्र शरदजी नाईक यांनी स्पष्ट करून शिबिरात ५०० पेक्षा अधिक युनिटचे संकलन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सदर रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी एस बी रिक्षा चालक मालक संघटनेच्या प्रतिनिधींचा तसेच नवी मुंबई ब्लड सेंटर यांचा अत्यंत मोलाचा सहभाग लाभल्याचेही डॉ नाईक यांनी सांगितले. यावेळी सर्व रक्तदात्यांचा सन्मानदेखील करण्यात आला. नवी मुंबईतील विविध क्षेत्रात कार्यरत अनेक मान्यवर मंडळींनी सदर शिबिराप्रसंगी उपस्थिती लावून ह्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.












सम्राट बहुउद्देशीय जनजागृती सेवा.भावी संस्था अंतर्गत साने संगीत क्लासेस आणि लोककला मंच यांच्या माध्यमातून विश्वरत्न बोधिसत्व महामानव भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 वी जयंतीनिमित्त साने संगीत क्लास उरुळी कांचन पुणे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला आयोजक संस्थेचे सचिव शिवराज ज्ञानोबा साने कार्यक्रमाची रूपरेषा बुद्ध वंदना व त्रिशरण पंचशील वभीम गीतांचा कार्यक्रम तसेच पोवाडा. भाषणे. जी .प. प्राथमिक.शाळा उरळी. कांचन येथे गरजू विद्यार्थ्यांना वस्त्रदान वाटप आलेल्या पाहुण्यांचे स्वागत सुनील तुपे. अमोल भोसले भाऊसाहेब महाडिक सुरेश वाळेकर सम्राट बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष.रेखा. साने अर्चना हत्ती वनिता पवार. पूजा कोटी. मोना घोडके साने संगीत कला मंच कलावंत विद्यार्थी आरोही सोळंके . विकास साने. तनया वाह्लेकर विनायक पवार श्लोक घोडके वैष्णवी साळुंके विशेष सहकार्य.दत्ता साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते क्लासमध्ये





.आयुष अविनाश तांबे इयत्ता दुसरी

# माहूल चे घरास अल्प प्रतिसाद

मुंबई महानगर पालिकेने त्यांच्या तृतीय आणि चतुर्थ श्रेणीतील कामचार्यांसाठी माहुल येथील नऊ हजार घरे विक्रीस काढलेली असून १५ एप्रिल पर्यंत अर्ज प्रकिया सुरू आहे.साडे बारा लाखात कर्मचाऱ्यांना ही घरे खरेदी करता येणार असली तरी मागील महिना दीड महिन्यात केवळ १७६ लोकांनीच घरासाठी अर्ज केले आहेत. हा प्रतिसाद खूपच अल्प असल्याने मुदतवाढ मिळेल हे नक्की.घरे जरी स्वस्तात उपलब्ध असली तरी येथे असणाऱ्या सोयी सुविधा, येथील केमिकल कंपन्या, स्वच्छतेचा अभाव यामुळे घरे घेण्यास अनेकजण इच्छुक नसल्याचे दिसून येत आहे.सध्या घरांच्या किमती दिवसेंदिवस वाढत आहेत. म्हाडा सिडको देखील अनेक नवीन प्रोजेक्ट करीत असते पण त्यांच्या घरांच्या किमती खूपच अवाढव्य असल्याने त्यांच्या लॉटरी ला देखील सध्या म्हणावा तसा नागरिक प्रतिसाद देत नाहीत.मध्यंतरी सिडकोने खारघर आणि आसपासच्या परिसरात घरे लॉटरी पद्धतीने विकण्यास काढली होती पण अनेकांनी किमती जास्त असल्याने फॉर्म भरले नाहीत.किमती आवाक्यात ठेवल्या तर सर्वसामान्यांना घरे घेण्यास नक्कीच परवडेल.तसेच नुसती घरे बांधून काही उपयोग नाही, त्याच्या किमती, तेथील सोयी सुविधा देखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

गणेश हिरवे
जोगेश्वरी पूर्व



डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती एल आय सी ऑफ इंडियाच्या बीड शाखेत साजरी करताना डी .एम सोनवणे , रविंद्र कांबळे, विनायक राऊत,अदीनाथ सोनवणे , सुनील वाघमारे,केशव लोंढे आदी दिसत आहेत

# उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांचा बीड दौरा

बीड, दि.15: उद्योग मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

बुधवार दि. 16 एप्रिल 2025 रोजी सकाळी 8.30 वाजता विमानाने छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व मोटारीने बीडकडे प्रयाण. स्थळ हॉटेल ग्रँड यशोदा, बार्शी रोड बीड येथे सकाळी 10.30. वाजता जिल्हा गुंतवणूक परिषद बीड 2025. दुपारी 12.00 वाजता हॉटेल ग्रँड यशोदा, बार्शी रोड बीड येथे पत्रकार परिषदेस उपस्थिती. दुपारी 12.30 वाजता बीड येथून मोटारीने छत्रपती संभाजीनगर विमानतळाकडे प्रयाण.

# दै उल्हास प्रभातच्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी नवी मुबंईतील लेखक वैभव पाटील यांची निवड

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी

ठाणे जिल्ह्यातील उल्हास प्रभात दैनिकाच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना त्या त्या क्षेत्रातील रत्न म्हणून गौरवण्यात येत येते. नवी मुंबई येथील वृत्तपत्रलेखक वैभव मोहन पाटील यांनी त्यांच्या आजवरच्या लेखन व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दै उल्हास प्रभातच्या सन २०२५ मधील राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी कुळगाव, बदलापूर येथील काटदरे मंगल कार्यालयात आयोजित भव्य कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. आमदार किसन कथोरे, दैनिक सकाळचे मुख्य संपादक राहुल गडपाले, परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले, बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष संजय जाधव आदी मान्यवरांच्या




उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असल्याचे उल्हास प्रभातचे संपादक डॉ गुरुनाथ बनोटे यांनी सांगितले आहे. यावेळी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचादेखील पारितोषिक वितरण सोहळा पार पडणार आहे. राज्यभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जवळपास ५० व्यक्तींना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. वैभव पाटील हे गेल्या १५-१६ वर्षांपासून नियमितपणे वृत्तपत्रलेखन करत असून साहित्य क्षेत्रात त्यांची दोन पुस्तकेदेखील प्रकाशित झाली आहेत. जॉय ऑफ गिव्हिंग ह्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून समाजातील दुर्लक्षित, गरजू विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठीदेखील त्यांचे भरीव योगदान आहे. त्यांच्या ह्या अतुलनीय कार्यासाठी त्यांना आजवर अनेक संस्था-संघटनांनी गौरवले आहे. दै उल्हास प्रभातने सुरू केलेली परंपरा अत्यंत कौतुकास्पद असून यामुळे लेखन, पत्रकारीता व समाजातील विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्वांना निश्चितपणे प्रेरणा मिळेल असे वैभव पाटील यांनी सांगितले.

# शिक्षा वो दरवाजा है, इसे खोलकर आप तरक्की के सारे दरवाजे खोल सकते हों किताबें खुद चुप रहती हैं, लेकिन जिसने पढ़ लिया, उसे बोलना और लड़ना सिखा देती हैं.- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

? संजय पाटील ®essenet™

? वरील विचारांमध्ये शिक्षणाची खरी उर्जा स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या साहाय्याने केवळ स्वतःचा उत्कर्ष साधला नाही, तर संपूर्ण समाजासाठी एक नवा मार्ग निर्माण केला. त्यांचे विचार आजही प्रत्येक दबलेल्या, दुर्लक्षित आणि उन्नतीच्या शोधात असलेल्या व्यक्तीला प्रेरणा देतात.

?शिक्षण हे केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित नसून, ते व्यक्तीला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव देणारे एक परिवर्तनकारी साधन आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात, "शिका, एकत्र या आणि लढा". या त्रिसूत्रीतील पहिले




पाऊल म्हणजे 'शिक्षण'. कारण शिक्षणाशिवाय व्यक्ती अंधारात राहते, रूढी-परंपरांमध्ये अडकते, आणि आपले खरं रूप विसरते.

? किती प्रभावी वाक्य आहे – "किताबें खुद चुप रहती हैं, लेकिन जिसने पढ़ लिया, उसे बोलना और लड़ना सिखा देती हैं." पुस्तकं निःशब्द असतात, पण ती वाचणाऱ्याला नवीन दृष्टी देतात, विचार करायला भाग पाडतात, अन्यायाविरुद्ध उभं राहण्याची हिंमत देतात. शिक्षण घेतलेला माणूस समाजात आपला अधिकार मागू शकतो. तो केवळ विचार मांडत नाही, तर नव्या दिशेने कृतीही करतो.

?डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं संपूर्ण आयुष्यच शिक्षणाच्या शक्तीवर भाष्य करतं. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण केलं. ज्याला समाजाने झिडकारलं, त्याच आंबेडकरांनी शिक्षणाच्या आधारावर केवळ भारतातच नव्हे तर जगभर आपली छाप सोडली. त्यांनी भारतीय संविधान तयार केलं आणि कोट्यवधी लोकांच्या आयुष्याला नवीन दिशा दिली.

? आजच्या तरुण पिढीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श अंगीकारावा. शिक्षण हे तुमचं खरं साधन आहे. या साधनाच्या जोरावर तुम्ही अन्यायाविरुद्ध लढू शकता, नवे क्षितिज गाठू शकता, आणि समाजात अमूलाग्र बदल घडवू शकता. शिक्षणामुळे केवळ तुमचं आयुष्यच नव्हे, तर समाजाचेही रूपांतर शक्य आहे.

? थोडक्यात शिक्षण ही सर्व उन्नतीच्या दारांची किल्ली आहे. ती एकदा हाती घेतली, की प्रगतीचे अनेक मार्ग आपोआप खुला होतात. ज्या समाजाने शिक्षणाची कास धरली, तो समाज सदैव पुढे गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हा विचार प्रत्येकाने मनापासून स्वीकारला पाहिजे – कारण शिक्षण हे केवळ भविष्य घडवत नाही, तर ते भविष्य बदलण्याची क्षमता निर्माण करतं. शिका, वाचा, विचारा – आणि उज्ज्वल इतिहास घडवा!

# निर्णयाचे स्वागत

चिंचवड देवस्थान ट्रस्ट कडून त्यांच्या अखत्यारित असणाऱ्या अष्टविनायकापैकी सिद्धटेक, मोरगाव, थेऊर, चिंचवडचा मोरया गोसावी संजीवनी मंदिर, खार नारिंगी मंदिर अशा पाच मंदिरात ड्रेस कोड लागू करण्यात येणार असल्याची बातमी वाचण्यात आली.खरेतर मंदिर आणि धर्मस्थळे ही आपल्या संस्कृतीची ओळख असते.काहीवेळा काही विशिष्ट ठिकाणी आपल्याला कसेही वागून आणि मनमानी करून चालत नाही.त्या स्थानाचे पावित्र्य जपणे हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य असते.पण बऱ्याचवेळा अनेक ठिकाणी आपल्याला अगदी कमी कपडे घातलेले स्त्री पुरुष दिसतात, जीन्स नको त्या ठिकाणी मुद्दाम फाडून ठेवलेल्या, शिवलेस ब्लाऊज, स्विमिंग सूट घालून देखील काहीजण दर्शन घेण्यासाठी येतात. हाफ पँट घालणं हल्ली स्त्री पुरुषांची फॅशन झाली आहे. आपली संस्कृती जपणे, तिची ओळख टिकवून ठेवणे यासाठी प्राधान्य द्यायला हवे.हल्ली आपण पश्चिमात्य लोकांची संस्कृती अवलंबित चाललो आहे तर परदेशातील लोक भारतात येऊन आपल्या भारतीय संस्कृतीची जमवून घेताना दिसतात.चांगले काय आणू वाईट काय आणि कोणते कपडे घालावेत, कोणते नाही एवढे शहाणपण आपल्या सर्वांकडे नक्कीच आहे.

गणेश हिरवे
जोगेश्वरी पूर्व

# गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्सव.

गांधी बाल मंदिर हायस्कूल कुर्ला मध्ये प्रतिवर्षीप्रमाणे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्सव मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबरच,सावित्रीबाई फुले आणि माता रमाई यासारखे वेगवेगळे वेशभूषा केलेले विद्यार्थी उपस्थित होते. सुरुवातीला गांधी बाल मंदिर शाळेचे माननीय पर्यवेक्षक श्री. खोंडे सर या यांनी महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना वंदन केले आणि सर्वांना जयंतीच्या शुभेच्छा देत या महामानवांच्या विचारांचे आचरण आपण करावे यासाठी विद्यार्थ्यांना






बहुमोल असे मार्गदर्शन केले. त्यानंतर भीम पाळणा गाण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. मंगला गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमानिमित्त निबंध स्पर्धा ,वक्तृत्व स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि एकपात्री अभिनय अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या दिवशी विद्यार्थी निर्मित हस्तलिखिताचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रणिता रुईकर मॅडम व श्री चव्हाण सरांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे हस्तलिखित तयार करून घेतले. श्री जागले सर व सौ प्रणिता रुईकर मॅडम यांनी आपल्या मनोगतातून महामानवांचे विचार मांडून सर्व विद्यार्थ्यांना उदबोधित केले . अपूर्वा सकपाळ ,सोहम सोलकर, अनुष्का नाईक, प्रबुद्ध केदारे अशा विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर असे वक्तृत्व सादर केले. कुमार सोहम गीजे या विद्यार्थ्याने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि कुमार आदित्य गायकवाड यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची अतिशय हुबेहूब वेशभूषा परिधान करून सुंदर असा अभिनय केला. श्री विचारे सर यांनी सुंदर हस्ताक्षरात फलक लेखन केले. कार्यक्रमात शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले .श्री बांगारे सर यांनी आभार प्रदर्शन केले. अशा प्रकारे सर्व विद्यार्थी, शिक्षक यांच्या वतीने या महामानवांची जयंती अत्यंत उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली.

# रविंद्र गिमोणकर कथालेखन स्पर्धेत अव्वल


कथालेखन स्पर्धेचे आयोजन करणे हे भाषिक कौशल्य विकसित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य असून लेखकांमध्ये आत्मविश्वास जागविण्यास प्रेरणादायी असते, असे प्रतिपादन कथालेखन स्पर्धेच्या निकालाप्रसंगी अध्यक्ष स्थानावरुन निशा डांगे यवतमाळ ह्या आभासी सोहळ्यात प्रतिपादन केले. मानवी मूल्य रुजविण्याचे तथा मानवी मनाला संस्कारक्षम करण्याचे कार्य जीवन गौरव साहित्य परिवार करत असल्याचे ते बोलले.

लघुकथा लेखनाची स्पर्धा काही नियम व अटीच्या अधीन राहून आयोजित करण्यात आली होती. कथालेखनाचे परीक्षण जीवन गौरव साहित्य परिवारच्या संयोजिका तोष्णा मोकडे यवतमाळ यांनी अगदी चिकित्साने केली असून त्याचा स्विकार सर्वांनी सहर्ष केला आहे. धकाधकीच्या आयुष्यात संस्कारक्षम कथांतून मानवी मूल्य रुजविण्यासाठी लेखन करणे, त्या इतरांना वाचनासाठी उपलब्ध करुन देणे हे चाललेले प्रयत्न पुढील पिढीसाठी फार गरजेचे आहे.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक रविंद्र गिमोणकर नागपूर(जळणारी झोपडी), द्वितीय गणेश कुंभारे ब्रम्हपुरी(सासुबाई), तृतीय कल्याणी मादेशवार यवतमाळ(एक होता चिमणा) आणि उत्तेजनार्थ किरण देशमुख चंद्रपूर (निर्गुडा माऊली) यांनी पटकावलेला आहे. याप्रसंगी चेतन ठाकरे गडचिरोली, उमेंद्र बिसेन पुणे, ज्योत्स्ना बन्सोड गडचिरोली, कविता शिरभाते यवतमाळ, प्रतिभा घुले भंडारा, वैशाली लांजेवार तळोधी बाळापूर, डॉ. प्रल्हाद हरिणखेडे मुंबई तसेच इतर मित्रमंडळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक गणेश कुंभारे सूत्रसंचालन चेतन ठाकरे तर आभार प्रदर्शन उमेंद्र बिसेन पुणे यांनी केले. समुहातर्फे विजेयी स्पर्धकांचे अभिनंदन करत आहेत.




## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्व संध्येला निमंत्रितांचे काव्यसंमेलन झाले



पुणे : १३ एप्रिल २०२५ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्व संध्येला निमंत्रितांचे काव्यसंमेलन झाले.याप्रसंगी पहिल्या विश्व काव्यसंमेलनाचे अध्यक्ष डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी प्रतिभावंत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.संविधानाचे आचरण जास्तीत जास्त प्रमाणात कसे होईल यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे असे प्रतिपादन डॉ.घाणेकर यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष प्रिया प्रमोद दामले यांनी केले.याप्रसंगी झालेल्या निमंत्रितांच्या काव्यसंमेलनात डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्यासह राहुल भोसले, मधुकर्णिका सारिका सासवडे, सुनील जोशी दीपाराणी गोसावी,नंदकिशोर गावडे आदिंनी आपल्या काव्यातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.समारोपात भारतीय जनता पार्टी, ज्येष्ठ नागरिक आघाडीच्या महिला कार्याध्यक्ष भारती महाडिक यांच्या शुभहस्ते डॉ. घाणेकर संपादित डहाळी विशेषांक प्रकाशित करण्यात आला.कार्यक्रमाचे संयोजन अजया मुळीक आणि माधुरी भागवत यांनी केले. प्रिया दामले यांनी आभार मानले.






लेखक गीतकार अहमद पिरनसाहब शेख, वसमत जिला हिंगोली, यांचे वडील लेखक गीतकार शाहीर , नाट्य कलावंत, असून ते असल श्रमिक शेतकरी सुध्दा होते, शेतीच्या सर्व कामात खूप हुशार, होते त्यांचे परिश्रमं अहमद शेख यांनी जवळून पाहिले व आपल्या काव्य लिखाणातून “बाप” या कवितेतून त्यांची छबी रेखाटण्याचा सुंदर प्रयत्न केला □□□□□

# नाशिक मध्ये संविधान विषयक खुले काव्य संमेलन खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. नाशिक मधील कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालय या ठिकाणी भारतीय संविधानाचे ७५ वे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान विषयी खुले कवी संमेलन खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले.शनिवार दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत नाशिक येथील कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालय मानव सेवा केंद्र,मायको सभागृह,राजे संभाजी स्टेडियम जवळ, सिडको नवे नाशिक ९ या ठिकाणी कविवर्य नारायण सुर्वे कविकट्टा १०६ मासिक काव्य मेळाव्यात फक्त संविधान विषयक कविता सादर करण्यात आल्या.या कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा.नागार्जून वाडेकर यांनी उपस्थित कवी कवयित्रीना बहुमुल्य असे मार्गदर्शन केले. कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालय कविकट्टा चे समन्वयक रविकांत शार्दुल यांनी आयोजन केले होते.शुभांगी माळी यांनी रंगतपणे सूत्रसंचालन केले, या संविधान विषयी कवी संमेलनात प्रथम क्रमांक शिवराज शिरसाठ,व्दीतीय क्रमांक निशांत गुरु, तृतीय क्रमांक डॉ. प्रशांत आंबरे, उत्तेजनार्थ सीमाराणी बागुल,उमेश जाधव यांनी मिळिवला. सर्व सहभागी कवी कवयित्रीना सहभाग प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.या कवी संमेलनात निशांत गुरु, शिवाजी पगारे,महेश देसले, उमेश जाधव, विशाल बागूल, कविता कासार, रमेश भवर, रमेश चौधरी, अरुण घोडेवार, गोपाळ खांडे,रंजन कापडणीस, सोनाली चव्हाण, सीमराणी बागुल, शुभांगी माळी, डॉ. प्रशांत आंबरे, संजय आहेर, रेखाताई सोनवणे, कविता बिरादी,शिवराज शिरसाठ, माणिकराव गोडसे, ज्योती अहिरे, रत्न दिप ,चेतन पनेर मिलिंद बनसोडे,दत्तु दाणी दत्ताराम बोरसे व इतर कवी कवयित्री उपस्थित होते.




# कांदिवली मध्ये पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. कांदिवली पश्चिम मधील पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सोमवार दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी कांदिवली पश्चिम स्वामी विवेकानंद रोड, पारेख नगर येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मनपा सर्व साधारण रुग्णालयाच्या कंपाऊंड मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला, रुग्णालयाच्या कंपाऊंड मधील माजी उपमहापौर स्व.शैलजा विजय गिरकर विश्रांती स्थळ या ठिकाणी मान्यवरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर विषयी आपले विचार व्यक्त केले,या वेळी माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार योगेश सागर, आमदार मनिषा चौधरी, आमदार संजय उपाध्याय यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन संघर्षावरील, संविधान निर्मिती बाबतीत माहिती सांगितली.पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने धम्म प्रार्थना म्हटली.





या जयंतीनिमित्त गोपाळ शेट्टी, आमदार योगेश सागर आमदार मनिषाताई चौधरी आमदार संजय उपाध्याय, गणेश खणकर, दिलीप पंडित, नगर सेवक कमलेश यादव, नगर सेविका प्रियांका मोरे, नगर सेविका प्रतिभा गिरकर, कांदिवली विभागातील पत्रकार साहित्यिक भारत कवितके, पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट चे संजय बावीस्कर, अशोक कांबळे,जय कांबळे, गजानन गवई , विपुल व्होरा, आदी उपस्थित होते तर भाजपा चे पुरुष व महिला पदाधिकारी कार्यकर्ते, पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट चे पदाधिकारी कार्यकर्ते, रुग्णालयातील कामगार, सुरक्षा रक्षक, रुग्णांचे नातेवाईक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com